पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - ११

**सभावृत्तांत**

**दिनांक – २७/१२/२०१९** **वेळ – दुपारी ३.०० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक **२७/१२/२०१९** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.तुषार रघुनाथ हिंगे - सभापती**
२. मा.अभिषेक गोविंद बारणे
३. मा.डोळस विकास हरिश्चंद्र
४. मा.सागर बाळासाहेब गवळी
५. मा.राजू मिसाळ
६. मा.निलेश हिरामण बारणे

या शिवाय मा.उल्हास जगताप – नगरसचिव, मा.पानसरे – क्रीडा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळेचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.३) मा.क्रीडा कला साहित्य व सांस्कृतिक समिती कार्यपत्रिका क्र.०७ ठराव क्र.४६ दि.१६/९/२०१९ मध्ये दुरुस्ती करणेबाबत. – मा.निलेश बारणे, मा.अभिषेक बारणे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४) मा.क्रीडा कला साहित्य व सांस्कृतिक समिती कार्यपत्रिका क्र.०७ ठराव क्र.४७ दि.१६/९/२०१९ मध्ये दुरुस्ती करणेबाबत. – मा.निलेश बारणे, मा.अभिषेक बारणे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५) आंतरशालेय कला स्पर्धा २०१९-२० आयोजित करणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता घेणेबाबत. –

विषय क्र.६) टेबल टेनिस सेंटर चालविण्यास देणेबाबत. – मा.निलेश बारणे , मा.अभिषेक बारणे यांचा प्रस्ताव.

----------

ठराव क्रमांक – ६४ विषय क्रमांक – ०१

दिनांक – २७/१२/२०१९ विभाग - क्रीडा

सुचक – मा.सागर गवळी अनुमोदक – मा.अभिषेक बारणे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/३/कावि/१८२/२०१९ दि.२५/०६/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाची प्रभाग क्रमांक २० संत तुकारामनगर येथील सांस्कृतीक भवन व्यायामशाळा महेशनगर जय भारत मित्र मंडळ संत तुकारामनगर पिंपरी या संस्थेस सेवाशुल्क तत्वावर ११ महिने कराराने चालविण्यास दिलेल्या व्यायामशाळाची मुदत दिनांक १७/०४/२०१९ रोजी संपुष्टात येत असल्याने व्यायामशाळेचा ठराव मंजूर झाल्यानंतर आदेशाच्या तारखेपासून पासून पुढे११ महिने कराराने दरमहा सेवाशुल्क र.रू.२०००/- मनपाकडून देवून सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता सदर ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ६५ विषय क्रमांक – ०२

दिनांक – २७/१२/२०१९ विभाग - क्रीडा

सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.सागर गवळी

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/७/कावि/७०३/२०१९ दि.०३/१२/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

कु.हर्षवर्धन महानंद यादव याने दोहा कतार येथे झालेल्या १४ व्या अशियाई नेमबाजी स्पर्धेमध्ये रौप्य पदक प्राप्त केल्यामुळे त्याला र.रू १,००,०००/- (अक्षरी र.रू एक लाख फक्त) आर्थिक सहाय्य अदा करणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता सदर ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – ६६ विषय क्रमांक – ०३

दिनांक – २७/१२/२०१९

सुचक – मा.निलेश बारणे अनुमोदक – मा.अभिषेक बारणे

मा.निलेश बारणे, मा.अभिषेक बारणे यांनी प्रस्तावित केलेनुसार मा.क्रीडा कला साहित्य व सांस्कृतिक समिती कार्यपत्रिका क्र.०७ मधील ठराव क्र.४६ नुसार " पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ह क्षेत्रीय कार्यालयांतर्गत एकूण ०२ सार्वजनिक वाचनालये व ०२ स्पर्धा परिक्षा केंद्रे कार्यरत आहेत. सदरचे सार्वजनिक वाचनालयांकरीता कथा, कांदब-या, ऐतिहासिक संदर्भ ग्रंथ, ऐतिहासिक पुस्तके, नाटके, काव्य, कथा संग्रह, आत्मचरित्र आणि इतर पुस्तके, खरेदी करणेत आली असल्याने झालेल्या एकूण देय र.रु.८४,८६२ मधून सुट (-) र.रु.२०,०२२/- वजा जाता एकूण बील र.रु.६४,८४०/- मधून आयकर २% र.रु.१२९७/- वजा जाता एकूण निव्वळ देय बिल र.रु.६३,५४३/- (अक्षरी र.रु.त्र्येसष्ठ हजार पाचशे त्र्येचाळीस फक्त) खर्चाचे अवलोकन करणेकामी मा.स्थायी समिती समिती कडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ६७ विषय क्रमांक – ०४

दिनांक – २७/१२/२०१९

सुचक – मा.निलेश बारणे अनुमोदक – मा.अभिषेक बारणे

मा.निलेश बारणे, मा.अभिषेक बारणे यांनी प्रस्तावित केलेनुसार मा.क्रीडा कला साहित्य व सांस्कृतिक समिती कार्यपत्रिका क्र.०७ मधील ठराव क्र.४७ नुसार " पिंपरी चिंचवड महानरगपालिकेच्या ह क्षेत्रीय कार्यालयांतर्गत चालविल्या जाणा-या ०२ सार्वजनिक वाचनालयांकरीता सन २०१८ या आर्थिक वर्षाकरीता वाचकांच्या आवडीनुसार आरोग्य, मनोरंजन, पाकशास्त्र, ज्योतिषशास्त्र, अध्यात्मिक, पर्यटन, विनोद इ. विषयांच्या दिवाळी अंकांची खरेदी करणेत आली असल्याने झालेल्या एकूण देय बिल र.रु.१८,३५२/- मधून आयकर २%(-) र.रु.३६७/- वजा जाता देय बील र.रु.१७,९८५/- (अक्षरी र.रु.सतरा हजार नऊशे पंच्याऐंशी फक्त) अदा करणेत आलेल्या खर्चाचे अवलोकन करणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक – ६८ विषय क्रमांक – ०५

दिनांक – २७/१२/२०१९

सुचक – मा.निलेश बारणे अनुमोदक – मा.अभिषेक बारणे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/४/कावि/६३१/२०१९ दि.२४/१२/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने, आंतरशालेय कला स्पर्धा २०१९-२० आयोजित करणेस व त्यानुषंगाने फ्लेक्स बॅनर, ट्रॉफिज व प्रमाणपत्र छपाई इ. खरेदी कोटेशन नोटीस प्रसिद्ध करून करणेस तसेच स्पर्धा आयोजनाकामी येणा-या अंदाजे खर्च र.रू.५,३८,१००/- अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता व सदर खर्च क्रीडा निधी मधील, म.न.पा.तर्फे आयोजित विविध क्रीडा स्पर्धा व क्रीडा कला साहित्य या लेखाशिर्षावर खर्ची टाकणेस, तसेच सदर स्पर्धा अनुषंगाने टेबल, खुर्च्या इ. खर्च स्थापत्य विभाग, संबंधित क्षेत्रिय कार्यालयातून व विद्युत स्पीकर, माईक व्यवस्था खर्च विद्युत विभाग, संबंधित क्षेत्रिय कार्यालयातून खर्ची टाकणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक – ६९ विषय क्रमांक – ०६

दिनांक – २७/१२/२०१९

सुचक – मा.निलेश बारणे अनुमोदक – मा.अभिषेक बारणे

मा.निलेश बारणे, मा.अभिषेक बारणे यांनी प्रस्तावित केलेनुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिके तर्फे मुरलीधर माचुत्रे व्यायामशाळा, चिंचवड च्यावर सरदार वल्लभभाई पटेल येथे टेबल टेनिस सेंटर तयार करणेत आलेले आहे. पिंपरी चिंचवड टेबल टेनिस असोसिएशन हे गेली ५ वर्षे पिंपरी चिंचवड शहरामध्ये टेबल टेनिस संदर्भात चांगले काम करीत आहे. मनपाच्या शाळेतील विद्यार्थ्यांना मोफत प्रशिक्षण देणार आहेत. पिंपरी चिंचवड शहरातील नवीन विकसित झालेले टेबल टेनिस सेंटर खेळाचा प्रचार व प्रसार होण्याच्या दृष्टीने पिंपरी चिंचवड टेबल टेनिस असोसिएशन यांना चालविणेस देणेकामी मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( तुषार रघुनाथ हिंगे )**
**सभापती**
मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/५८६/२०१९
दिनांक : २७/१२/२०१९

(उल्हास बबनराव जगताप)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकड पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.